35314

अखिल भारतीय सेवेतील अधिका-यांना हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक हिंभाप-१०८५/६८४/२०,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - १९ नोव्हेंबर, १९८५.

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक-हिंभाप-१०८३-१४४८-वीस
दिनांक १७/१२/८३
शासन निर्णय क्रमांक-हिंभाप-१०८३/१४४८/वीस,
दिनांक १ डिसेंबर १९८४

निर्णय:- हिंदी अधिक मराठी इत्यादी संयुक्त विषय घेऊन माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा उच्चस्तर परीक्षा उत्तीर्ण होणा-या अधिका-यांना व कर्मचा-यांना एतदर्थ मंडळाची हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून दिनांक १७/१२/१९८३ पासून सूट देण्यात आलेली आहे.

शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, अखिल भारतीय सेवेतील (भारतीय प्रशासन सेवा, भारतीय पोलीस सेवा व भारतीय वन सेवा) अधिका-यांनी अनुक्रमे मसुरी, अबू व डेहराडून येथे प्रशिक्षण घेत असतांना परिविक्षाधीन कालावधीत राष्ट्रभाषा हिंदीची परीक्षा उत्तीर्ण केली असल्यास महाराष्ट्र राज्यात वर्ग झालेल्या अधिका-यांना शासनाने विहित केलेल्या हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात यावी. हे आदेश दि. १७/१२/८३ च्या पूर्वलक्षी प्रभावाने अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सही)
कार्यासन अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई (पत्राने)
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई (पत्राने)
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)